**राज्यस्तरीय डिजिटल इंडिया समिती स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः GAD-मातंसं०१७/४४/DIT**
माहिती तंत्रज्ञान संचालनालय
मंत्रालय, मुंबई-४०००३२
तारीख: ३१ मार्च, २०१५

**वाचा -**

**१) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्रमांकः मातंसं/नस्ती-२०१०/प्र.क्र.४८/३९, दि. १७ एप्रिल, २०१०**
**२) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्रमांकः मातंसं-२०११/प्र.क्र.१२५/३९, दि. २८ सप्टेंबर, २०११**

<u>प्रस्तावना</u>

डिजीटल इंडिया कार्यक्रम हा केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम असून “भारताला डिजीटली सक्षम आणि ज्ञान अर्थव्यवस्थेमध्ये परिवर्तीत करणे” हे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. डिजीटल इंडिया कार्यक्रमाचे “प्रत्येक नागरीकाकरिता पायाभूत सुविधा”, “मागणीनुसार प्रशासन आणि सेवा” आणि “नागरीकांचे डिजीटली सक्षमीकरण” असे तीन प्रमुख दृष्टीकोन आहेत. नागरीकांच्या अपेक्षा आणि राज्याच्या सामाजिक व आर्थिक गरजांची पुर्तता करण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाचा सदर डिजिटल इंडिया हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राज्यामध्ये राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. माहिती तंत्रज्ञान विषयक कृती कार्यक्रम व माहिती तंत्रज्ञान धोरण राबविण्यासाठी आणि केंद्र सरकारच्या युनिक आयडेन्टीटी ॲथॉरिटी प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी याकरिता मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपरोक्त १७/४/२०१० च्या शासन निर्णयानुसार मंत्रिमंडळ उप समिती स्थापन करण्यात आली होती. तसेच उपरोक्त दि.२८/९/२०११ च्या शासन निर्णयानुसार ई-प्रशासनामध्ये प्रशासकीय सुधारणा सुचविण्यासाठी मंत्रिमंडळ उप समितीची स्थापना करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर डिजिटल इंडिया या कार्यक्रमाची राज्यस्तरावरील संरचना करण्यासाठी व त्यावर देखरेख करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपरोक्त दोन्ही मंत्रिमंडळ उपसमितींचे समायोजन करुन एकच “राज्यस्तरीय डिजिटल इंडिया समिती” स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

१. शासन असा निर्णय घेत आहे की, उपरोक्त शासन निर्णय दिनांक १४/४/२०१० आणि २८/९/१०११ नुसार स्थापन करण्यात आलेल्या दोन्ही मंत्रिमंडळ उप समित्या रद्द करुन डिजिटल इंडिया कार्यक्रम राज्यामध्ये राबविण्यासाठी, राज्यस्तरावर संरचना व देखरेख करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली “राज्यस्तरीय डिजिटल इंडिया समिती” ही एकच समिती स्थापन करण्यात येत आहे. या समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | समितीचे सभासद | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २ | मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव (प्रशासकीय सुधारणा) सा.प्र.वि. | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव, वित्त | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव, नियोजन | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव, महसूल | सदस्य |
| ७ | उप महासंचालक (युआयडीएआय) | सदस्य |
| ८ | अपर मुख्य सचिव (मातं), सा.प्र.वि. | सदस्य सचिव |

२. समितीचे सदस्य सचिव राष्ट्रीय सूचना केंद्र, सीडॅक, महाऑनलाईन व इतर विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यकतेनुसार समितीच्या बैठकीसाठी आमंत्रित करतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३३११२११०५७७११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

r a ant
ari a hav

Digita sign r a ant ari
a hav
D l o Dir torat o In ormation
T hno og o oint r tar
osta o ४०००३२ st aharashtra
s ria m r ०a४४ ६५ ४३९०६७८६२
८ २११ ५ ९३a ५३ ५८a३ ६२१२६ a६७८
३६९५३४६९२ o n r a ant ari
a hav
Dat २०१५.०३.३१ १४ ५४ ३० ०५ ३०

**सू.ह.जाधव**
शासनाचे सह सचिव (मातं)

**प्रति,**

१) राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
४) सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
६) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
७) सचिव, राज्य निवडणूक आयोग (पत्राने),
८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
९) सचिव, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई (पत्राने),
१०) सचिव, महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई (पत्राने),

११) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
१२) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई
१३) महालेखापाल, महाराष्ट्र-२ ( लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
१४) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर
१५) अधिदान व लेख अधिकारी, मुंबई,
१६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१७) मुख लेखा परीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
१८) सर्व विभागीय आयुक्त,
१९) सर्व जिल्हाधिकारी,
२०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२१) सा.प्र.वि. कार्यासन-३९
२२) सर्व मंत्रालयीन विभाग,
२३) निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख